महाराष्ट्र शासन

कौशल्य,रोजगार,उदयोजकता व नाविन्यता विभाग,मंत्रालय,मुंबई-४०००३२

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

३,महापालिका मार्ग,मेट्रो सिनेमासमोर,मुंबई-४०० ००१

व्यवसाय शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी

# माहिती-पुस्तिका

# २०२५-२६

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पान.क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | अभ्यासक्रमाच्या मान्यतेच्या अटी व शर्ती | ४ |
| ३ | अर्ज प्रक्रिया व नोंदणी शुल्क | ६ |
| ४ | मान्यता देण्याची कार्यपध्दती | ६ |
| ५ | संस्थेची गुणवत्ता व सुधार प्रणाली | ७ |
| ६ | मानकाप्रमाणे अभ्यासक्रमनिहाय आवश्यक असणारी जागा, यंत्रसामुग्री व विद्युतपुरवठा | ९ |
| ७ | शिक्षकीय पदांची मानके | ११ |
| | **परिशिष्टे** | |
| १ | +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाची यादी | ८ |
| २ | मानकाप्रमाणे अभ्यासक्रमनिहाय आवश्यक असणारी जागा, यंत्रसामुग्री व विद्युतपुरवठा- व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम | ९ |
| ३ | आवश्यक दस्तऐवज | १४ |
| ४ | स्वयंघोषणा पत्र | १५ |
| ५ | संस्था जुनी असल्यास सुरु असलेले अभ्यासक्रमाबाबत सादर करावयाची माहिती. | १८ |
| ६ | संस्था जुनी असल्यास सुरु असलेले व्यवसाय अभ्यासक्रमाची मागिल तीन वर्षांची माहिती. | १९ |

## १.प्रस्तावना

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत माध्यमिक स्तरावर तसेच +२ स्तरावर सन २०२५-२६ या वर्षात +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

### अ) +२ स्तरावरील व्दिलक्षी (BIFOCAL) व्यवसाय अभ्यासक्रम:

डॉ.कोठारी आयोगाच्या १९६४ च्या शिफारशीनुसार अधिकाधिक युवकांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने १९७८-७९ पासून राज्यात व्यवसाय विषयांची ३०% व्याप्ती असलेले, +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यांत आले. तांत्रिक / वाणिज्य / कृषी / मत्स्य या गटातील एकूण १६ व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यात येत होते. कौशल्य,रोजगार,उदयोजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. व्हिओसी-२०२३/प्र. क्र. १४/कौशल्य-२, दिनांक २० जुन २०२३ अन्वये राष्ट्रीय व्यवसाय आराखडयाप्रमाणे (NSQF) नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांच्या मानकांना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. व्हिओसी -२०२३/प्र. क्र. १४/कौशल्य-२, दिनांक २४ नोव्हेंबर २०२३ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे.

सद्यस्थितीत राज्यातील शासकीय/अशासकीय संस्थामधील +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाकरीता राज्यात एकूण १९०५ संस्थामधून १९६२०५ इतकी प्रवेश क्षमता उपलब्ध आहे. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-२०१७ /प्र.क्र.१५७/व्यशि-४, दिनांक १०.०५.२०१८ नुसार पुर्व व्यावसायिक अभ्यासक्रम व + २ स्तरावरील व्यवसाय अभ्यासकमांच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यासाठीची ऑनलाईन प्रमाणित कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.त्यानुसार सदर अभ्यासक्रम सुरू करण्यास इच्छुक असणाऱ्या संस्थांना vti.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाऊन विहीत कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा लागेल.

सन २०२५-२ या वर्षात खालील परिशिष्ठ-१ मध्ये नमुद व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

## २. अर्जदार संस्थांची पात्रता:

२.१ संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत / पंजीकृत असणे आवश्यक आहे.

२.२ +२ स्तरावरील दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांची मागणी करणाऱ्या संस्थांकडे इयत्ता ११ वी व १२ वी करीता शालेय शिक्षण विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे.

## ३. अभ्यासक्रमांच्या मान्यतेच्या अटी व शर्ती

३.१ महाराष्ट्र राज्य शासन मान्यता प्राप्त शालेय शिक्षण विभागाची शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सुरु करावयाचे परवानगीचे पत्र (शिक्षण उपसंचालक यांचे प्रथम खाते मान्यता पत्र)

३.२ विहित पायाभूत सुविधा मानकाप्रमाणे उपलब्ध असणे बंधनकारक आहे. (स्वतंत्र बांधकाम,यंत्रसामुग्री, विद्युत पुरवठा इ.)

३.३ संस्थेविरुध्द कोणत्याही प्रकारच्या गंभीर स्वरुपाच्या वा अन्य तक्रारी नसाव्यात.

३.४ संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत/ पंजीकृत असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेस सद्य:स्थितीत सुरु असलेल्या कनिष्ठ महाविद्यालये,शाळा व इतर अभ्यासक्रमांची यादी सादर करावी लागेल.

३.६ शासनाकडून संस्था ताब्यात घेणेबाबत व तत्सम बाबतीत कोणतीही न्यायालयीन प्रकरणे प्रलबिंत नसावीत.

३.७ संस्थेत अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी ही **कायम स्वरुपी विनाअनुदान** तत्वावर देण्यात येईल व भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जाणार नाही. यासंबंधीचा सोसायटीच्या ठरावाची प्रत रु.१००/- चे कोर्ट स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहील.

३.८ संस्थेने विहित मानकांनुसार आवश्यक कर्मचारी/ शिक्षक नियमित वेतनश्रेणीत नेमण्याबाबतचा ठराव सादर करणे आवश्यक राहील.

३.९ संस्थेकडे अभ्यासक्रमास आवश्यक असणारे मानकांप्रमाणे सर्व प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करण्याबाबतचा ठराव व राष्ट्रीयकृत बॅंकेचे बॅंक बॅलेन्स प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्यापूर्वीच्या ३ महिन्याच्या कालावधीतील) सादर करणे आवश्यक राहील.

३.१० संस्थेस मागील ३ वर्षाचे ऑडिटेड फायनान्सियल स्टेटमेंट सादर करणे आवश्यक राहील.

३.११ अभ्यासक्रमांस मंजुरी दिल्यानंतर कर्मचारी वर्गाची सेवाविषयक व वेतन विषयक संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

३.१२ अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यास तो विनाअट व विनाविलंब अमंलात आणण्याची हमी संस्थेस द्यावी लागेल.

३.१३ प्रत्यक्ष विद्यार्थी प्रवेक्षाची संख्या सतत ३ वर्ष मंजूर क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी असल्यास अभ्यासक्रमांची मान्यता काढून घेण्यात येईल.

३.१४ कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेले माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम/+२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम असा फलक संस्थेच्या दर्शनि भागात लावणे आवश्यक आहे.

३.१५ माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता शालेय शिक्षण विभागातंर्गत इयत्ता ९ वीचे माध्यमिक स्तरावरील वर्ग सुरु करण्यास शालेय शिक्षण विभागाची मान्यता असल्यासच सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात येईल.

३.१६ +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता शालेय शिक्षण विभागातंर्गत इयत्ता ११ वीचे उच्च माध्यमिक वर्ग सुरु करण्यास मान्यता असल्यासच एका तुकडीस एक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीस परवानगी देण्यात येईल.

३.१७ सर्व संस्थांचे बाबतीत जागा/पाणी/विजपुरवठा/प्रसाधनगृहे इ.मुलभूत सुविधा उपलब्ध असल्याशिवाय परवानगी देण्यात येणार नाही.

३.१८ परवानगी प्राप्त झाल्यानंतर संस्थेला माध्यमिक शाळा सहिता व एम.ई.पी.एस. नियम १९८१ नुसार आवश्यक ते सर्वलेखे संस्था स्तरावर ठेवणे बंधनकारक राहील.

३.१९ संस्थेने माध्यमिक शाळा सहितेतील नियमांचे पालन न केल्यास अथवा शासनाने व संचालनालयाने दिलेल्या आदेशाचे, परिपत्रकाचे पालन न केल्यास संस्थेची मान्यता तात्काळ रद्य करण्यात येईल.

३.२० मान्यता प्राप्त अभ्यासक्रम मान्यता दिलेल्या शैक्षणिक वर्षात संस्थेने सुरु न केल्यास अथवा सदर अभ्यासक्रमांत सतत ३ वर्ष विद्यार्थी प्रवेश न झाल्यास सदर अभ्यासक्रमाची मान्यता आपोआप संपुष्टात येईल. तद्नंतर संस्थेस सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता प्रक्रिया नव्याने करणे आवश्यक राहील.

३.२१ जागा मालकीची असल्यास मालकीबाबतचे पुरावे (उदा. ७/१२ चा उतारा जोडणे आवश्यक राहील.)

३.२२ जागा भाडयाची असल्यास जागेचे भाडेकरार पत्र ५ वर्ष कालावधीकरीता आणि दुय्यम सहाय्यक निबंधकाकडे नोंदणीकृत केलेले असणे आवश्यक राहील.

३.२३ इमारत बांधकामास स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेतलेली असावी, तसेच इमारत बांधकाम नकाशा शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांने प्रमाणित व चिन्हाकिंत केलेला असणे आवश्यक आहे.

३.२४ अर्ज करतेवेळी संस्थांनी चालू अभ्यासक्रमांसाठी मानकांप्रमाणे जागा व स्थळ दर्शक वास्तूविशारद तज्ञांनी साक्षाकिंत केलेला नकाशा व प्रस्तावित नवीन सुरु करावयाची अभ्यासक्रमांसाठी प्रस्तावित जागा स्वतंत्रपणे (क्लास रुम आणि प्रयोगशाळा) स्थळ दर्शक नकाशा सादर करणे आवश्यक आहे. नवीन बांधकाम प्रस्तावित असेल तर तसे नमूद करुन स्थळदर्शक नकाशा सादर करणे आवश्यक आहे.

३.२५ विद्युतभारासाठी मिटर सिलिंग रिपोर्ट व मागील ३ महीन्याचे मंजुर विद्युतभार (KW) दर्शविणारे विजेचे देयक जोडणे आवश्यक राहील.(व्यवस्थापनाच्या/प्रस्तावित संस्थांच्या नावाने विजदेयक असणे आवश्यक आहे.)

३.२६ ज्या अभ्यासक्रमांस शेतकी जागा आवश्यक आहे त्याच्या मालगी हक्काचे पुरावे, ७/१२ उतारा,सोसायटी किंवा संस्थेच्या नावावर असणे आवश्यक आहे. शेतकी जागेत पाणी उलब्धतेबाबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

३.२७ शेतजमीन भाडयाची असेल तर विद्युत मिटर संस्था/ सोसायटीच्या नावावर असणे आवश्यक आहे किंवा जागा मालकाचे विद्युत मिटर वापरण्यासाठीचा रु.१००/- स्टॅम्प पेपरवर करारनामा आवश्यक राहील.

## ४. अर्ज प्रक्रिया व नोंदणी शुल्क

अर्ज करतेवेळी खालीलप्रमाणे आवश्यक शुल्काचा भरणा ऑनलाईन पध्दतीने करावा लागेल.

- अर्ज प्रक्रिया शुल्क: रु.२०००/-
- प्रत्येक व्यवसाय अभ्यासक्रमासाठी प्रति तुकडी शुल्क : रु.१००००/-प्रति तुकडी

## ५. मान्यता देण्याची कार्यपध्दती

५.१ पात्रताधारक अर्जदार संस्था संचालनालयाच्या संकेतस्थळावर रु.२०००/- इतके अर्ज प्रक्रिया शुल्क (नोंदणीशुल्क) ऑनलाईन पध्दतीने भरुन नोंदणी करेल. त्यानंतर अर्ज करत असताना संबंधित अर्जाबरोबर पात्रता सिध्द करणेसाठी आवश्यक असलेले दस्तऐवज/कागदपत्र ऑनलाईन स्वरुपात अपलोड करतील.

५.२ संस्था प्रत्येक व्यवसाय अभ्यासक्रमासाठी प्रति तुकडी शुल्क : रु.१००००/- याप्रमाणे एकुण शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरेल.

५.३ शुल्क भरल्यानंतर संस्थेस निरीक्षणाकरीता ऑनलाईन पध्दतीने कालावधीची निवड करावी लागेल. मात्र निरीक्षणाच्या वेळी संस्थेकडे मानकाप्रमाणे आवश्यक यंत्रसामुग्री, साधनसामुग्री, पूर्णवेळ शिक्षक (प्रात्यक्षिक), विदयुत भार इ. १००% उपलब्ध असणे बंधनकारक आहे. जॉबरोल निहाय यंत्रसामुग्री तसेच साधनसामुग्रीची यादी पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

५.४ प्रत्यक्ष निरीक्षणाकरीता संगणकीय प्रणालीव्दारे संबंधित निरीक्षण Agency पैकी एक निरीक्षण Agency निरीक्षणाकरीता निर्धारित करण्यात येईल.

५.५ निर्धारीत केलेल्या निरीक्षण Agency ने ४८ तासाच्या आत निरीक्षणाकरीता ऑनलाईन स्वीकृती (Online Acceptance) करावी. अन्यथा संगणक प्रणालीव्दारे निरीक्षणाकरीता अन्य निरीक्षण Agency निर्देशित (Designate) करण्यात येईल.

५.६ निरीक्षण Agency निरीक्षणाकरीता संस्थानिहाय निरीक्षण वेळापत्रक तयार (Inspection Schedule) करतील. तसेच किमान ३ सदस्यिय निरीक्षण समितीची स्थापना करेल. समितीत विषय तज्ञांचा समावेश करण्यात यावा.

५.७ निरीक्षण समिती कनिष्ठ महाविदयालयास प्रत्यक्ष भेट देवून अभ्यासक्रमांसाठीच्या मानकांप्रमाणे निरीक्षण करुन आपले अभिप्राय प्रत्येक बाब निहाय पोर्टलवर नोंदवतील. तसेच अंतिम शिफारस नोंदवेल. सदरचा अहवाल समिती ऑनलाईन प्रणालीव्दारे संचालनालयास सादर करेल.

५.८ प्राप्त झालेल्या निरीक्षण अहवालांची संचालनालय स्तरावर छाननी करुन त्रुटींबाबत निरीक्षण समितीस ऑनलाईन प्रणालीव्दारे कळविण्यात येईल.

५.९ निरीक्षण समिती ऑनलाईन प्रणालीव्दारे संचालनालयास त्रुटी पुर्तता सादर करेल.

५.१० प्राप्त त्रुटी पुर्तता अहवालाची संचालनालय स्तरावर छाननी करुन प्रस्ताव शासनास अंतिम

मान्यतेकरीता सादर करण्यात येईल.

५.११ शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर संस्थेस ऑनलाईन प्रणालीव्दारे कळविण्यात येईल.

५.१२ शासन निर्णयाव्दारे मान्यता मिळाल्यानंतर सदर कनिष्ठ महाविदयालयास इ.११ वी करीता प्रवेश करण्याची परवानगी राहील.

५.९ निरीक्षण केलेल्या संस्थांपैकी १०% संस्थांची संगणकाव्दारे निवड करण्यात येऊन संचालनालयामार्फत संबंधित संस्थांचे पुर्न:निरीक्षण करण्यात येईल.

## ६.संस्थेची गुणवत्ता व सुधार प्रणाली

६.१ शासनाने मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचा दर्जा व गुणवत्ता उच्च प्रतीचा राखण्याच्या दृष्टीने संचालनालय स्तरावरुन नियमितपणे प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रशिक्षण गुणवत्ता तपासण्यासाठी प्रत्येक वर्षी ७५% पेक्षा कमी निकाल असणाऱ्या संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात येईल. एखाद्या संस्थेचा निकाल सतत ३ वर्षामध्ये ७५% पेक्षा कमी असल्यास सदर संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

६.२ शासनाने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाच्या तुकडीत सतत ३ वर्ष मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर संस्थेची मान्यता आपोआप रद्द होईल.

# परिशिष्ट – १

## +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय (Bifocal) अभ्यासक्रम

| अ.क्र. | गटाचे नांव | पेपर | व्यवसाय अभ्यासक्रमाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | गट – १ | पेपर – १ | Field Technician-Wireman Control Panel<br>(Qualification Pack:Ref.Id.ELE/Q7302) |
| २ | | पेपर – २ | Lineman Distribution<br>(Qualification Pack:Power-PSS/Q0102) |
| ३ | गट – २ | पेपर – १ | Field Technician-Computing and Peripherals<br>(Qualification Pack: Ref. Id. ELE/Q4601) |
| ४ | | पेपर – २ | Field Technician – Air Conditioner<br>(Qualification Pack :Ref. Id. ELE/3102) |
| ५ | गट – ३ | पेपर – १ | Four-Wheeler ServiceTechnician<br>(Old:- Auto Service Technician L4)<br>(Qualification Pack: Ref. Id.ASC/Q1402) |
| ६ | | पेपर – २ | Auto Service Technician (Two and Three Wheeler)<br>(Qualification Pack: Ref. Id.ASC/Q1411) |
| ७ | गट – ४ | पेपर – १ | Junior Software Developer<br>(Qulification Pack: Ref. Id. SSC/Q0508) |
| ८ | | पेपर – २ | Field Technician-Computing and Peripherals<br>(Qualification Pack: Ref. Id. ELE/Q4601) |
| ९ | गट – ५ | पेपर – १ | General Mason (Qualification Pack: Ref.Id.CON/Q0103) |
| १० | | पेपर – २ | Construction Painter and Decorator<br>(Qualification Pack: Ref. Id. CON/QP-0503 |
| ११ | गट – ६ | पेपर – १ | Plumber - General<br>(Qualification Pack: Ref. Id. PSC/Q0104) |
| १२ | | पेपर – २ | Agriculture Machinery Operator<br>(Qualification Pack:Ref.Id. AGR/Q1103) |
| १३ | गट – ७ | पेपर – १ | Business Correspondent and Business Facilitator<br>(Qualification Pack: Ref. Id.BSC/Q8401) |
| १४ | | पेपर – २ | Distributor Salesman<br>(Qualification Pack: Ref. Id. RAS/Q0604) |
| १५ | गट – ८ | पेपर – १ | Dairy Farmer / Dairy Entrepreneur<br>(Qualification Pack: Ref. Id. AGR/Q4101) |
| १६ | | पेपर – २ | Small Poultry Farmer<br>(Qualification Pack:Ref. Id. AGR/Q4306 |
| १७ | गट – ९ | पेपर – १ | Organic Grower<br>(Qualification Pack :Ref. Id. AGR/Q1201) |
| १८ | | पेपर – २ | Irrigation Service Technician<br>(Qualification Pack :Ref. Id. AGR/Q1104) |
| १९ | गट – १० | पेपर – १ | Floriculturist (Open Cultivation)<br>(Qualification Pack : Ref. Id. AGR/Q0701) |
| २० | | पेपर – २ | Gardener<br>(Qualification Pack : Ref. Id.AGR/Q0801) |

# परिशिष्ट -२

## मानकाप्रमाणे अभ्यासक्रमनिहाय आवश्यक असणारी जागा,यंत्रसामुग्री व विद्युतपुरवठा

+२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | तुकडी | प्रवेश क्षमता | विद्युतभार (कि.वॅट) | वर्गखोल्या (चौ.फुट) | कार्यशाळा (चौ.फुट) | कृषीक्षेत्र/ खुली जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 6 | 7 | 8 | 11 |
| 1 | Field Technician-Wireman Control Panel (Qualification Pack:Ref.Id.ELE/Q7302) | 1 | 50 | 5 KW | 300 | 1000 | --- |
| 2 | Lineman Distribution (Qualification Pack:Power-PSS/Q0102) | | | | | 500 | --- |
| 3 | Field Technician-Computing and Peripherals (Qualification Pack: Ref. Id. ELE/Q4601) | 1 | 50 | 5 KW | 300 | 400 | |
| 4 | Field Technician – Air Conditioner (Qualification Pack :Ref. Id. ELE/3102) | | | | | 400 | --- |
| 5 | Four-Wheeler ServiceTechnician (Old:- Auto Service Technician L4) (Qualification Pack: Ref. Id.ASC/Q1402) | 1 | 50 | 5 KW | 300 | 1000 | --- |
| 6 | Auto Service Technician (Two and Three Wheeler) (Qualification Pack: Ref. Id.ASC/Q1411) | | | | | 1000 | --- |
| 7 | Junior Software Developer (Qulification Pack: Ref. Id. SSC/Q0508) | 1 | 50 | 5 KW | 300 | 400 | --- |
| 8 | General Mason (Qualification Pack: Ref.Id.CON/Q0103) | 1 | 50 | 2 KW | 300 | 750 | 1500 Sq.ft.(Open Yard) |
| 9 | Construction Painter and Decorator (Qualification Pack: Ref. Id. CON/QP-0503) | | | | | 750 | |
| 10 | Plumber - General (Qualification Pack: Ref. Id. PSC/Q0104) | 1 | 50 | 5 KW | 300 | 800 | --- |
| 11 | Agriculture Machinery Operator (Qualification Pack:Ref.Id. AGR/Q1103) | | | | | 1000 | 5000 sq.ft. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | Business Correspondent and Business Facilitator (Qualification Pack: Ref. Id.BSC/Q8401) | 1 | 50 | 2 KW | 300 | 440 | --- |
| 13 | Distributor Salesman (Qualification Pack: Ref. Id. RAS/Q0604) | | | | | 440 | --- |
| 14 | Dairy Farmer / Dairy Entrepreneur (Qualification Pack: Ref. Id. AGR/Q4101) | 1 | 50 | 3 KW | 300 | 1250 | 1 Acre |
| 15 | Small Poultry Farmer (Qualification Pack:Ref. Id. AGR/Q4306 | | | | | 1250 | 0.5 Acre |
| 16 | Organic Grower (Qulification Pack :Ref. Id. AGR/Q1201) | 1 | 50 | 2 KW | 300 | 1250 | 1 Acre |
| 17 | Irrigation Service Technician (Qualification Pack :Ref. Id. AGR/Q1104) | | | | | 1250 | 1 Acre |
| 18 | Floriculturist (Open Cultivation) (Qualification Pack : Ref. Id. AGR/Q0701) | 1 | 50 | 2 KW | 300 | 1250 | 1 Acre |
| 19 | Gardener (Qualification Pack : Ref. Id.AGR/Q0801) | | | | | 1250 | 1 Acre |

## परिशिष्ट – ३

## शिक्षकीय पदांची मानके.

### +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम

शासन निर्णय क्र. व्हिओसी -२०२३/प्र. क्र. १४/कौशल्य-२, मंत्रालय, मुंबई. दिनांक :- २४ नोव्हेंबर २०२३

| अ क्र | पदनाम | आवश्यक पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | पूर्णवेळ शिक्षक (प्रात्यक्षिक) | प्रत्येक व्यवसाय अभ्यासक्रमातील (जॉब रोल) विषय – १ करीता एक पूर्णवेळ शिक्षक (प्रात्यक्षिक) व विषय – २ करीता एक पूर्णवेळ शिक्षक (प्रात्यक्षिक) अशी दोन शिक्षकीय पदे राहतील. |

**+२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या पूर्णवेळ शिक्षक(प्रात्यक्षिक) यांची शैक्षणिक अर्हता व अनुभव**

| Sr. No. | New Course name | Qualification |
|---|---|---|
| 1 | Field Technician-Wireman Control Panel (Qualification Pack:Ref.Id.ELE/Q7302) | Bachelor of Engineering in Electronics/ Electrical. Additionally should have done a Diploma or certificate course in Control Panel Wiring of residential / Industrial systems.<br>The suggested qualification is the minimum criteria. However higher qualifications such as Bachelor of Engineering in Electronics |
| 2 | Lineman Distribution (Qualification Pack:Power-PSS/Q0102) | B. Tech in Electrical Engineering from a recognized Instiute/ University, with at least 1 year work / teaching experience<br>OR<br>Diploma in Electrical Engineering with 3 years of work / teaching experience |
| 3 | Field Technician-Computing and Peripherals (Qualification Pack: Ref. Id. ELE/Q4601) | Bachelor of Engineering / Technology in Electronics or Computer science / Technology<br>OR<br>Master of Computer Application (MCA) OR<br>Master of Science (Computer Science)<br>OR Master of Science (Information Technology)<br>OR NIELIT "B" Level Certificate.<br>It is recommended to have additional qualification such as CCNA, CCP or any other diploma in computer hardware maintenance. |
| 4 | Field Technician – Air Conditioner (Qualification Pake:Ref. Id. ELE/3102) | Master degree in Refrigeration and Air Engineering / Bachelor of Engineering /Technology in Electrical / Electronics<br>OR<br>Master of Science in Electronics / Electrical.<br>It is recommended to have the specialised qualifiation in Air Conditioning. |

| | | |
|---|---|---|
| 5 | Four-Wheeler Service Technician<br>(Old:- Auto Service Technician L4) (Qualification Pack: Ref. Id.ASC/Q1402) | Degree in Automobile Engineering /Mechanical Engineering from a recognized Institute/University, with at least 1 - year work / teaching experience Or<br>Diploma in Automobile Engineering /Mechanical Engineering from a recognized Institute/University, with at least 1 - year work / teaching experience |
| 6 | Auto service Technician (Two and Three Wheeler)<br>(Qualification Pack: Ref. Id.ASC/Q1411) | Degree in Automobile or Mechanical Engineering from a recognized Institute/University, with at least 1 - year work / teaching experience<br>Or<br>diploma inAutomobile or Mechanical Engineering from a recognized Institute/University, with at least 3 - year work / teaching experience<br>Or<br>B.voc in Automotive with at least 1 year of experience |
| 7 | Junior Software Developer (Qulification Pack: Ref. Id. SSC/Q0508) | Bachelor of Engineering/ Technology in Computer Science / Technology OR Master of Computer Application (MCA) OR Master of Science (Computer Science) ORMaster of Science (information technology)OR NIELIT "B" Level Certificate.<br>**Desirable** : Knowleage of Software Development |
| 8 | General Mason<br>(Qualification Pack: Ref.Id.CON/Q0103) | B. Tech in Civil Engineering from a recognized Institute /University, with at least 1 year work / teaching experience<br>OR<br>Diploma in Civil Engineering with 2 year work / teaching experience |
| 9 | Construction Painter and Decorator (Qualification Pack: Ref. Id. CON/QP-0503 | Degree in Engineering from a recognized Institute /University, with at least 1 year working /teaching experience<br>OR<br>Diploma in Engineering from a recognized Institute /University with at least 2 years working/ teaching experience<br>OR<br>Any graduate having working or teaching experience of 2 years in construction painting<br>**Desirable**: Should have a valid certificate of trainer in the domain of "Construction Painter and Decorator, Level 4" or Painter course approved by any government institute |
| 10 | Plumber - General<br>(Qualification Pack: Ref. Id. PSC/Q0104) | B. Tech in Civil Engineering, Agricultural Engineering, Mechanical Engineering and B.Voc.(Bachelor in Vocation) from a recognized Institute/University, with at least 1-year work / teaching experience OR<br>Diploma in Civil engineering / Agricultural Engineering/ Mechanical Engineering with 2 years work / teaching experience. |

| | | |
|---|---|---|
| 11 | Agriculture Machinery Operator (Qualification Pack:Ref.Id. AGR/Q1103) | Degree in Agricultural Engineering<br>OR Mechanical Engineering from a recognized Institute/University, with at least 1 year work / teaching experience<br>OR<br>Diploma in Agricultural Engineering or Civil engineering from a recognized Institute / University, with at least 3 year work / teaching experience |
| 12 | Business Correspondent and Business Facilitator (Qualification Pack: Ref. Id.BSC/Q8401) | Post- graduation in Commerce/ management/ finance from a recognized institute/University, with at least one year work experience |
| 13 | Distributor Salesman (Qualification Pack: Ref. Id. RAS/Q0604) | M.Com in Marketing Management, P.G. Diploma in Marketing Management with at least 50% marks and 1 year experience. Preference given to higher education with MBA (Marketing Management) and P.G. Diploma in Marketing Management. |
| 14 | Dairy Farmer / Dairy Entrepreneur (Qualification Pack: Ref. Id. AGR/Q4101) | Post- graduation in Dairying/Animal Husbandry from a recognized Institute/University, with at least 1 year work experience. |
| 15 | Small Poultry Farmer (Qualification Pack:Ref. Id. AGR/Q4306 | Bachelors in Veterinary Science<br>OR<br>Post- graduation in agriculture/life science with specialization in Poultry Science / Livestock Production Management/Animal Genetics & Breeding /from a recognized Institute/ University, with at least two years' work experience. |
| 16 | Organic Grower | Post- Graduation in Agriculture/ Horticulture from a recognized Institute/University, with at least 1 year work / teaching experience |
| 17 | Irrigation Service Technician (Qualification Pack :Ref. Id. AGR/Q1104) | Degree in Agricultural Engineering or Civil Engineering from a recognized Institute/ University, with at least 1 year work / teaching exprience<br>OR<br>Diploma in Agricultural Engineering or Civil Engineering from a recognized Institute / University, with at least 3 year work / teaching experience. |
| 18 | Floriculturist (Open Cultivation) (Qualification Pack : Ref. Id. AGR/Q0701) | Post- graduation in Horticulture from a recognized Institute / University, with at least 1 year work experience |
| 19 | Gardener (Qualification Pack : Ref. Id.AGR/Q0801) | Post- graduation in Horticulture from a recognized Institute / University, with at least 1 year work experience |

## परिशिष्ट ४

**आवश्यक दस्तऐवज**

संस्थेने +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आवश्यक दस्तऐवजाचा तपशिल

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | नोंदणी प्रमाणपत्र | १) मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० |
| | | २) सोसायटी ॲक्ट अधिनियम १८६० |
| २ | संस्थेकडे अभ्यासक्रमास आवश्यक असणारे मानकांप्रमाणे सर्व प्रयोगशाळा साहीत्य उपलब्ध करण्याबाबतचा ठराव व राष्ट्रीयकृत बँकेचे बँक बॅलन्स प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्यापूर्वीच्या ३ महिन्याच्या कालावधीतील) | |
| ३ | जागेचा तपशिल ७/१२ स्थळदर्शक नकाशा, क्षेत्रफळ इत्यादी दस्तऐवज | |
| ४ | संस्थेचे नावे /व्यवस्थापनाचे नावे असलेले मागील ३ महिन्याचे मंजूर विद्युतभार (Kw) दर्शविणारे विद्युत देयक व मीटर सिलिंग रिपोर्ट | |
| ५ | संस्थेत अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी ही कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर देण्यांत आली असून भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जाणार नाही.  या संबंधीच्या सोसायटीच्या ठरावाची प्रत | |
| ६ | विहित मानकानुसार आवश्यक कर्मचारी / शिक्षक नियमित वेतनश्रेणीत नेमण्याबाबतचा ठराव | |
| ७ | कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्याचे स्वयंघोषणा पत्र (परिशिष्ट ५) | |
| ८ | कला/वाणिज्य/शास्त्र शाखेचे वर्ग महाविद्यालयीन वर्ग सुरु करण्यास शालेयशिक्षण/उच्चशिक्षण खात्याचे मान्यताप्राप्त पत्र | |
| ९ | एच.एस.सी. बोर्डाचा नोंदणीक्रमांक | |
| १० | संस्था जुनी असल्यास सुरु असलेले अभ्यासक्रमाबाबत सादर करावयाची माहिती. (परिशिष्ट ६) | |
| ११ | संस्था जुनी असल्यास मागील ३ वर्षातील इ.११ वी व १२ वी प्रवेश व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा तपशिल (परिशिष्ट ७) | |
| १२ | जागा भाडयाची असल्यास दुय्यम सहाय्यक निबंधकाकडे नोंदणीकृत केलेला ५ वर्ष मुदतीचा भाडेकरारनामा. | |
| १३ | स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व शासनानं प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित व चिन्हांकित केलेला बांधकाम नकाशा. | |
| १३ | जागा भाडयाची असेल तर वीजवापराबाबत ना-हरकत प्रमाणपत्र व वीजदेयकाची प्रत | |
| १४ | शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणा-या शैक्षणिक कर्मचा-यांची अर्हता प्रमाणपत्रे | |
| १४ | प्रस्तावित अभ्यासक्रमाचे वेळापत्रक | |

**परिशिष्ट ५**

# स्वयंघोषणा पत्र

या हमीपत्राद्वारे मी श्री / श्रीमती ............................................... पदनाम ................. संस्थेचे नाव ................................................ प्रमाणित करतो की संस्थेला खालील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम

१)

२)

३)

४)

सुरु करण्यास शासनाची मान्यता मिळण्यासाठी संचालनालयाच्या ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज सादर करीत असून खालील प्रमाणे हमी देत आहे.

१. महाराष्ट्र राज्य शासन मान्यता प्राप्त शालेय शिक्षण विभागाची शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सुरु करावयाच्या परवानगीचे पत्र (शिक्षण उपसंचालक यांचे प्रथम खाते मान्यता पत्र) सोबत जोडण्यांत आले आहे.
२. सदर अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता आवश्यक असणाऱ्या विहित पायाभूत सुविधा (स्वतंत्र बांधकाम, यंत्रसामुग्री, विद्युत पुरवठा) संस्थेमध्ये उपलब्ध आहेत.
३. संस्थेविरुध्द कोणत्याही प्रकारच्या गंभीर स्वरुपाच्या वा अन्य तक्रारी नाहीत.
४. संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत / पंजीकृत आहे. (सोबत प्रमाणपत्र जोडण्यांत आले आहे)
५. संस्थेमध्ये सद्यस्थितीत सुरु असलेली कनिष्ठ महाविद्यालये, शाळा व इतर अभ्यासक्रमांची यादी सादर करण्यांत आलेली आहे.
६. शासनाकडून संस्था ताब्यात घेणेबाबत व तत्सम बाबतीत कोणतीही न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित नाहीत.
७. संस्थेत अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी ही कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर देण्यांत आली असून भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जाणार नाही. या संबंधीच्या सोसायटीच्या ठरावाची प्रत रु.१००/- चे कोर्ट स्टॅम्प पेपरवर देण्यांत आलेली आहे. तसेच शासनातर्फे/संचालनालयातर्फे/महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेतर्फे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेशाचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील
८. विहित मानकानुसार आवश्यक कर्मचारी / शिक्षक नियमित वेतनश्रेणीत नेमण्याबाबतचा ठराव सादर करण्यांत आलेला आहे.

९. संस्थेकडे अभ्यासक्रमास मानकांप्रमाणे आवश्यक असणारे सर्व प्रयोगशाळा साहीत्य उपलब्ध करण्याबाबतचा ठराव व राष्ट्रीयकृत बँकेचे बँक बॅलन्स प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्यापूर्वीच्या ३ महिन्याच्या कालावधीतील) सादर करण्यांत आले आहे.

१०.अभ्यासक्रमास मंजूरी दिल्यानंतर कर्मचारी वर्गाची सेवाविषयक व वेतन विषयक संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील, याची नोंद घेण्यांत आली आहे.

११.अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यास तो विनाअट व विनाविलंब अमंलात आणण्याची हमी देण्यांत येत आहे.

१२.प्रत्यक्ष विद्यार्थी प्रवेशाची संख्या सतत ३ वर्ष मंजूर क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी असल्यास अभ्यासक्रमाची मान्यता काढून घेण्यांत यावी.

१३.+२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता शालेय शिक्षण विभागांतर्गत इयत्ता ११ वी चे उच्च माध्यमिक वर्ग सुरु करण्यास मान्यता असेल तरच एका तुकडीकरीता एक द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमास परवानगी देण्यांत येईल, याची मला जाणीव आहे.

१४.संस्थेत व्यवसाय अभ्यासक्रम सुरु केल्यामुळे कोणतेही शिक्षकीय कर्मचारी अतिरीक्त होणार नाहीत याची दक्षता संस्थेमार्फत घेण्यांत येईल.

१५.संस्थेमध्ये जागा / पाणी /विजपुरवठा/प्रसाधनगृहे इ.मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत.

१६.परवानगी प्राप्त झाल्यानंतर संस्था माध्यमिक शाळा संहिता व एम.ई.पी.एस नियम १९८१ नुसार आवश्यक ते सर्व लेखे संस्था स्तरावर ठेवण्यांत येतील.

१७.संस्थेने माध्यमिक शाळा संहितेतील नियमांचे पालन न केल्यास अथवा शासनाने व संचालनालयाने दिलेल्या आदेशाचे, परिपत्रकाचे पालन न केल्यास संस्थेची मान्यता तात्काळ रद्द करण्यांत येईल, याची नोंद घेण्यांत आलेली आहे.

१८. मान्यता प्राप्त अभ्यासक्रम मान्यता दिलेल्या शैक्षणिक वर्षात संस्थेने सुरु न केल्यास अथवा सदर अभ्यासक्रमांत सतत ३ वर्ष विद्यार्थी प्रवेश न झाल्यास सदर अभ्यासक्रमाची मान्यता आपोआप संपुष्टात येईल. तद्नंतर संस्थेस सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता प्रक्रीया नव्याने करणे आवश्यक राहील, याची नोंद घेण्यांत आलेली आहे.

१९.महाराष्ट्र कृषी,पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरू करण्यास मनाई करण्याकरिता अधिनियम २०१३ अधिनियमाच्या कलम ५ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना सक्षम प्राधिकारी म्हणून अधिसूचित केलेले आहे. त्यानुसार समूचित प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेशिवाय व्यवसाय शिक्षणाशी संबंधित अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठयक्रम सुरु करणा-या संस्थाविरुध्द व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत वरील अधिनियमातंर्गत कार्यवाही केली जाते. सबब, शासनाकडून मान्यता मिळाल्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्याशिवाय प्रस्तावित अभ्यासक्रमांसाठी (जॉब रोल साठी) विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही, याची आम्हांला जाणीव आहे.

२०.असे प्रमाणित करण्यांत येते की, ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना vti.dvet.gov.in या संकेतस्थळावर सादर केलेली माहिती प्रत्यक्ष तथ्यांवर आधारीत असून वैयक्तिकरित्या प्रमाणित करण्यांत आली असून ती योग्य आहे. जर सादर करण्यांत आलेली माहिती चूकीची आढळून आल्यास शासनाकडून मान्यता दिली जाणार नाही आणि भविष्यात सदरची माहिती चूकीची आढळून आल्यास संस्थेची मान्यता रद्द केल्यास आमचा कोणताही आक्षेप नसेल.

२१.संचालक, सहसंचालक, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी किंवा यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी कोणतीही पूर्वसूचना न देता निरीक्षणाकरीता आल्यास त्यांना पूर्ण सहकार्य देणे बंधनकारक असेल. तसेच निरीक्षणादरम्यान संस्था आवश्यक मानकांची पूर्तता करीत नाही, असे निदर्शनास आल्यास कोणतीही संधी न देता व्यवसाय अभ्यासक्रमाची मान्यता रद्द करण्यांत येईल, याची आम्हांला जाणीव आहे.

२२.प्रस्तावित अभ्यासक्रमाचा प्रस्ताव त्रुटीयुक्त असल्यास सदर प्रस्तावाच्या मान्यतेसाठी मी कोणत्याही प्रकारचा दबाव आणणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :- संस्थेचे सचिव / अध्यक्ष यांची सही व शिक्का

## परिशिष्ट ६

**संस्था जुनी असल्यास सुरु असलेले अभ्यासक्रमाबाबत सादर करावयाची माहिती.**

| अ. क्र | अभ्यास क्रमाचे नाव | तुकडी संख्या | अभ्यासक्रम सुरु झाल्याचे वर्ष | यापूर्वीच्या अभ्यासक्रमासाठी व्यवसाय शिक्षण विभागाचे मान्यता पत्र क्रमांक व दिनांक | कला/वाणिज्य/शास्त्र शाखेच्या तुकडीस शिक्षणखात्याचे मान्यता प्राप्त पत्र क्रमांक व दिनांक व प्रवेशक्षमता | एच.एस.सी बोर्डाचा नोंदणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

दिनांक:-

ठिकाण:- अर्जदाराची सही व शिक्का

## परिशिष्ट ७

**संस्था जुनी असल्यास सुरु असलेले व्यवसाय अभ्यासक्रमाची मागिल तीन वर्षांची माहिती.**

| अ. क्र. | अभ्यास क्रमाचे नाव | मंजूर प्रवेश क्षमता | २०२१-२२ | | | २०२२-२३ | | | २०२३-२४ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इ ११ वी प्रवेश घेतले विद्यार्थी | इ. १२ वी परिक्षेस बसलेले विद्यार्थी | इ १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी | इ ११ वी प्रवेश घेतले विद्यार्थी | इ. १२ वी परिक्षेस बसलेले विद्यार्थी | इ १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी | इ ११ वी प्रवेश घेतले विद्यार्थी | इ. १२ वी परिक्षेस बसलेले विद्यार्थी | इ १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

अर्जदाराची सही व शिक्का

- **व्दिलक्षी अभ्यासक्रमासाठी इ.११ वी व इ.१२ वी ची माहिती दयावी**

संपर्क :

संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर,

३, महापालिका मार्ग टपालपेटी क्र.१०००३६,मुंबई ४००००१

दुरध्वनी क्र.२२६२०१९१,२२६२०२९३,२२६२०६०३/४

फॅक्स:०२२-२६७५६२८

ई-मेल : **desk8@dvet.gov.in**

**Website: www.dvet.gov.in**